**प्रेसनोट** **दिनांक:- २५/०८/२०२३**

**अंधेरी पोलीस ठाणे कडुन २० किलो ४०० ग्रॅम वजनाचा '' गांजा'' किंमत अंदाजे ५,१०,०००/- रू मुद्येमाल जप्त करून ०१ पुरूष आरोपी व ०४ महिला आरोपींना अटक केल्याबाबत**

दिनांक २५/०८/२०२३ रोजी रात्रौ ००.१० वा चे दरम्यान अंधेरी पोलीस ठाणे हद्दीत रात्रपाळी गस्ती दरम्यान केसरबाई चाळ समोरील उघडे मैदान, तेली क्रॉस लेन, तेलीगल्ली, अंधेरी पूर्व, मुंबई येथे एक इसम व चार महिला सोबत सफेद रंगाची बारदाणी पिशवी घेवून जात असताना दिसले. सदर इसम व महिला पोलीसांना पाहताच लगबगीने चालू लागल्या. त्यामुळे त्यांची हालचाल संशयास्पद वाटल्याने तसेच त्याचे जवळील हातात असलेल्या सफेद रंगाच्या बारदाणी पिशवीमध्ये संशयास्पद सामान असल्याबाबत संशय आल्याने, लागलीच सदर इसम व महिलांना हटकून जागीच अटकाव केला. त्यावेळी सदर पुरुष व महिलांच्या हातात सफेद रंगाच्या बारदाणी पिशवीत काय आहे अशी विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे देवू लागल्याने तात्काळ दोन पंचाना घटनास्थळी बोलावून पंचासमक्ष नमूद पुरुष व चार महिला यांचेकडे असलेल्या सफेद रंगाच्या बारदाणी पिशवीची पाहणी केली असता पिशवीच्या आतमध्ये खाकी रंगाच्या चिकट टेप लावलेले सात पुडके दिसुन आले. सदर पुडके पंचासमक्ष खोलून पाहीले असता त्यामध्ये '' गांजा'' हा अंमलीपदार्थ असल्याचे निष्पण्ण झाले. त्यावरून अंधेरी पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र. ४३१/२०२३, कलम ८ (क) सह २० (क), २९ एन.डी.पी.एस कायदा १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन नमुद एक पुरूष व चार महिला यांना अटक करण्यात आली आहे.

**हस्तगत करण्यात आलेल्या मुद्येमालाचे वर्णन**

**१) २० किलो ४०० ग्रॅम वजनाचा '' गांजा'' किंमत अंदाजे ५,१०,००० रू**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री. सत्यनारायण चौधरी , मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. परमजित सिंह दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १० मुंबई, श्री. दत्ता नलावडे, मा. सहायक पोलीस आयुक्त अंधेरी विभाग, मुंबई श्री.डॉ. शशिकांत भोसले, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संताजी घोरपडे व पोलीस निरीक्षक गुन्हे बालाजी दहिफळे यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली सपोनि सचिन करंजकर, पोउनि अमित यादव, पोउनि रविंद्र लाखण, पोह. ९८०५४३/गांगुर्डे, पो.ह. ०१४६०/वायंगणकर, पोह ०३०८२३/भोईटे, पो.ह. ०४.०७२३/गांवकर, मपोशि ०७१३९६/आंबेकर यांनी उल्लेखनीय कामगिरी पार पाडली.

-----ooo-----